# SANDU PHARMACEUTICALS LIMITED

CIN:L24233GA1985PLC001587

**Regd. Office:** Plot Nos. 25, 26, 29 & 30, Pilerne Industrial Estate, Marra, Saligao, Bardez, Goa 403511.
Tel: +91 832 2407474 / 6715000, E-mail: sandupharma@sandu.in, Website: www.sandu.in

**Ref: Corp. Sec/2026-27/BSE/420**

**Dated:04.04.2026**

**To**
**Department of Corporate Services**
**Bombay Stock Exchange Limited,**
**Phirojshah Jeejobhoy tower,**
**Dalal Street,**
**Mumbai-400001**

**Sub: Newspaper Publication**

**Sir,**

**With reference to the above subject, please find enclosed herewith copies of the newspaper publication of the notice regarding Second 100-Day Campaign - "Saksham Niveshak" - for KYC and Related Updation's and Shareholder Engagement to Prevent Transfer of Unpaid/Unclaimed Dividends to IEPF and Special Window for Transfer and Dematerialisation of Physical Securities Pursuant to SEBI Circular No. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/ I/3750/2026 dated January 30, 2026 in the Navprabha and Navhind Times newspaper.**

**You are requested to take the same on record and oblige.**

**Thanking you,**

**Yours Faithfully,**

**FOR SANDU PHARMACEUTICALS LIMITED**

PRATIKA PRATHAMESH MHAMBRAY

Digitally signed by PRATIKA PRATHAMESH MHAMBRAY
Date: 2026.04.04 14:16:16 +05'30'

**Pratika Mhambray**
**Company Secretary and Compliance Officer**

SANDU PHARMACEUTICALS LIMITED GOA

## निवडक

### मुळस-दोडामार्ग येथे कारला भीषण अपघात

**दोडामार्ग (न. प्र.)**

दोडामार्ग तालुक्यातील मुळस येथे एका कारचा (टीएस १३ ईव्ही ०४०५) भीषण अपघात झाला. यात कारच्या दर्शनी भागाचे प्रचंड नुकसान झाले असून सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. संबंधित कार ही तेलंगणा राज्यातील असून ती या मार्गावरून प्रवास करत असताना मुळस परिसरात हा अपघात झाला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### महाभारतावर उद्या पिळर्ण येथे परिसंवाद

**पणजी (सां. प्र.)**

'महाभारत'मधील कथानकाच्या मुळाशी स्त्रियांची निर्णायक भूमिका असल्याचा नवा दृष्टिकोन पुढे आणणारा विशेष परिसंवाद उद्या रविवार दि. ५ एप्रिल रोजी सकाळी ११वाजता 'मोग संडे' उपक्रमांतर्गत पिळर्ण औद्योगिक वसाहती मधील म्युझियम ऑफ गोवा, (मोग) मध्ये आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादात ख्यातनाम पटकथालेखक तथा अध्यापक संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते अंजुम राजाबली महाभारतातील स्त्री पात्रांचा सखोल अभ्यास मांडणार आहेत. प्रवेश विनामूल्य असून उपस्थित राहण्यासाठी पूर्वनोंदणी ७७२२०८९६६६ या क्रमांकावर संदेशाद्वारे नोंद करावी, असे कळवले आहे.

## सहवेदना

### कृष्णनाथ दत्ताराम परब

**माशेल (पत्रक)**



कुंभारजुवे येथिल कृष्णनाथ दत्ताराम परब (४७) यांचे गोवा वैद्यकीय महाविद्यालयात उपचारादरम्यान सोमवार दि. ३० रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि आठ वर्षांची मुलगी आहे. त्यांच्या पार्थिवावर दि. ३१ मार्च रोजी माडापै स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सत्तरीत सलग आपत्कालीन घटनांची मालिका

### आग लागून काजू बागायतीचे नुकसान

**वाळपई (प्रतिनिधी)**

**सत्तरी तालुक्याच्या अनेक भागांमध्ये गुरुवारी संध्याकाळी तुरळक पाऊस लागला. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे झाडे पडण्याच्या घटना घडल्या. यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला. विद्युत तारांवर झाडे पडल्यामुळे वीजवाहिन्यांचे नुकसान झाले. सत्तरी तालुक्याच्या अनेक भागांमध्ये रस्त्यावर झाडे पडून नुकसान झाले. वाळपई अग्निशामक दलाच्या जवानांनी तात्काळ अनेक ठिकाणी धाव घेऊन रस्त्यावर पडलेली झाडे हटविली. त्याचप्रमाणे घरावर पडलेली झाडे हटविण्यात महत्त्वाचे योगदान दिले. त्याचप्रमाणे सकाळच्या सत्रामध्ये अनेक ठिकाणी काजू बागायतीना आग लागून नुकसान होण्याच्या घटना घडल्या.**

सत्तरी तालुक्यातील मोर्ले परिसरात गुरुवारी दुपारनंतर सलग आपत्कालीन घटनांची मालिका घडल्याने वाळपई अग्निशामक दलाच्या जवानांची मोठी धावपळ उडाली. आगीची घटना तसेच झाडे रस्त्यावर कोसळणे, विद्युत तारा तुटणे अशा विविध घटनांमध्ये अग्निशामक दलाने तत्काळ प्रतिसाद देत परिस्थिती नियंत्रणात आणली.

दुपारी बागवाडा, मोर्ले येथील पाण्याच्या टाकीजवळ काजू बागायतीला आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच वाळपई अग्निशामक दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या पथकाचे नेतृत्व ए. एन. देसाई यांनी केले. आग आटोक्यात आणण्यात यश आले असून या घटनेत अंदाजे २०,००० रुपयांचे नुकसान झाले, तर सुमारे ५०,००० रुपयांची मालमत्ता वाचवण्यात यश मिळाले. यामुळे बागायतीचे मालक गुरुदत्त कामत यांनी वाळपई अग्निशामक दलाचे आभार मानले.

संध्याकाळच्या सत्रात काही प्रमाणात वादळी वारा झाल्यामुळे नुकसान झाले. वेळूस, वाळपई येथील रवळनाथ मंदिराजवळ काजू झाडाची फांदी रस्त्यावर कोसळून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. वाळपई अग्निशामक दलाचे पथक श्री. के. सी. नाईक यांच्या नेतृत्वाखाली घटनास्थळी पोहोचून रस्ता त्वरित मोकळा करण्यात आला.

**झाडे व विद्युत तारा पडल्या**

घोडेमळ मोर्ले येथील सातेरी मंदिराजवळ झाड रस्त्यावर कोसळल्याची घटना घडली. तसेच मोर्ले कॉलनी येथे झाडासह विद्युत तारा रस्त्यावर पडल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती. या सर्व घटनांमध्ये अग्निशामक दलाच्या जवानांनी तत्परतेने कार्यवाही करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या मोहिमेत के. सी. नाईक, ए. व्ही. नाईक, ए. जी. नार्वेकर व ए. ए. शेटकर यांनी सहभाग घेतला. या घटनांमध्ये कोणतेही नुकसान झाले नाही.

**घरावर आम्रवृक्ष पडला**

घोडेमळ, मोर्ले तसेच केरसरकर वाडा, मोर्ले येथेही अग्निशामक दलाने धाव घेतली. केरसरकर वाडा येथे आंब्याचे झाड दोन घरांवर कोसळल्याची घटना घडली. या घटनेत सुमारे ५,००० रुपयांचे नुकसान झाले, तर अंदाजे ८०,००० रुपयांची मालमत्ता वाचवण्यात आली. या सर्व कारवाईत श्री. देसाई, आर. आर. कवठणकर, जी. डी. पावणे व के. एच. गावंकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्व घटनांनंतर अग्निशामक दलाचे पथक रात्री उशिरापर्यंत काम करीत होते.

### अग्निशमक दलाची धावपळ, मोठे नुकसान टळले





**सत्तरी तालुक्यात एका काजू बागायतीला लागलेली आग. वाऱ्यामुळे पडलेली झाडे हटवताना वाळपई अग्निशामक दलाचे जवान.** (छाया : दीपा सावंत)

पिसुर्ले मार्गावर वडाकडे (सत्तरी) येथील पुलाजवळ एक वासरू दरीत पडल्याची माहिती मिळताच वाळपई अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. श्री. देसाई यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दोरीच्या साहाय्याने वासराला सुरक्षित बाहेर काढले. या मोहिमेत उमेश गावकर व गोकुळदास डेगवेकर यांनी सहभाग घेतला.

**कोरड्या गवताला आग**

दुपारी भुईपाल (सत्तरी) येथील विहीरीकडे परिसरात कोरड्या गवताला आग लागल्याची घटना घडली. वाळपई अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही हानी झाली नाही.

**घरावर झाडे कोसळली**

याच परिसरातील भेडशीवाडा, भुईपाल येथे दुपारी आंब्याच्या झाडाची मोठी फांदी घरावर कोसळल्याची घटना घडली.

अग्निशमन दलाने तातडीने मदतकार्य करत परिस्थिती सुरळीत केली. या घटनेतही कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाली नाही. या घटनांमध्ये सतीश नाईक यांच्या नेतृत्वाखालील पथक कार्यरत होते. या पथकात प्रसाद पी. नाईक, सुधाकर व्ही. गावकर, रामू नाईक व अविनाश गावकर याचां समावेश होता.

दुपारी पाली येथील जांबळी मार्गावर गेटजवळ काजूचे झाड रस्त्यावर कोसळल्याची घटना घडली. प्रदीप एस. गावंकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने झाड हटवून वाहतूक सुरळीत केली.

# खणलेल्या रस्त्यांचे हॉटमिक्सिंग करा

### » पर्वरीतील नागरिकांनी केली मागणी

**पर्वरी (न. प्र.)**

पर्वरीतील रस्ते सार्वजनिक बांधकाम खात्याने सध्या एप्रिल मे महिन्यातच रस्ते फोडण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे तेथील रहिवाशांना धुळीचा त्रास होऊ लागला आहे. गेल्या वर्षीही पर्वरीतील नागरिकांना एप्रिल मे महिन्यात धुळीचा त्रास आणि पावसाळ्यात चिखल मातीचा त्रास सोसावा लागला होता.

संबंधित खात्याने नवीन पाईप लाईन टाकण्यासाठी पर्वरीतील अनेक रस्ते फोडण्याचे काम हाती घेतले आहे. यामुळे वाहनचालकांना वाहने चालवताना आणि रहिवाशांना धूळ खावी लागत आहे. येथील काही ज्येष्ठ नागरिकांनी याबद्दल या प्रतिनिधीशी आपली खंत व्यक्त केली आहे.

अवकाळी पाऊस कधीही पडू शकतो, आणि त्यामुळे येथील नागरिकांना पुन्हा एकदा चिखल मातीचा त्रास सहन करावा लागेल अशी भीती नागरिकांनी केली आहे. मतदारसंघाचे आमदार तथा मंत्री रोहन खंवटे आपल्या परीने मतदारसंघ नीटनेटका राहण्यासाठी प्रयत्न करीत आहे, अनेक विकास कामे करून नागरिकांना सोयीसुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत तर सरकारी बांधकाम खाते नियोजनशून्य कामे हाती घेऊन नागरिकांसमोर समस्या निर्माण करीत आहे. बांधकाम खात्याने त्वरित कामे उरकून खणलेले खड्डे पुरवून तेथील रस्त्यांचे हॉटमिक्सींग करावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**पर्वरीतील अनेक भागांत खणलेले रस्ते व त्यामुळे होत असलेली वाहतूक कोंडी.** (छाया : शेखर वायंगणकर)




**फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड. लिलाव सूचना**

ही सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि. यांनी एनपीए (नॉन-परफॉर्मिंग ॲसेट) झालेल्या किंवा मार्जिन ब्रिच खाती किंवा कर्जाच्या **अटी व शर्तीमध्ये** नमूद केलेल्या लोन रिकॉल कलमाच्या अंतर्गत येणाऱ्या खात्यांमधील (खाली नमूद केलेल्या) सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. लिलाव खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार आयोजित केला जाईल.

| लिलाव तारखा | शाखा लिलाव तारीख १५ एप्रिल २०२६ | जिल्हा लिलाव तारीख २० एप्रिल २०२६ |
|---|---|---|
| कर्ज खाते क्रमांक | मूळ शाखा | जिल्हा १ संपर्क |
| एफईडीजीएल०३७०००००७५०६, ०००७५१३, ०००७५२०, ०००७५२१, ०००७५४४, ०००७५५६ | म्हापसा - ७५८८२०५८५४ | म्हापसा ७५८८२०५८५४ |
| एफईडीजीएल०३८००००६९१४, ०००६९३६ | पणजी - ९०४९६००९५६ | म्हापसा ७५८८२०५८५४ |
| एफईडीजीएल०५१८०००३५०३ | फोंडा - ९०४९७७५२५२ | फोंडा - ९०४९७७५२५२ |
| एफईडीजीएल०५२१०००३२१०, ०००३२३०, ०००३२७२ | साखळी - ९५७९७८६१५० | म्हापसा ७५८८२०५८५४ |
| एफईडीजीएल०४४५०००४२७९, ०००४२९६, ०००४३३३, ०००४३३४ | वास्को - ७०६६४३७५९३ | म्हापसा ७५८८२०५८५४ |

ठिकाण किंवा तारखेमध्ये कोणतेही बदल झाल्यास ते आमच्या वेबसाइटवर https://www.fedfina.com/gold-loan/special-sections/auction-venue/ येथे प्रदर्शित केले जातील. आपले सोन्याचे दागिने मुक्त करायची इच्छा असलेल्या ग्राहकांनी, लागू अटी व शर्तीच्या अधीन राहून, लिलावाच्या तारखेस/पूर्वी वरील कोणत्याही शाखेला भेट द्यावी किंवा वरील क्रमांकावर संपर्क साधावा. लिलाव संबंधित शाखेतच आयोजित केला जाईल. दिलेल्या तारखेला कोणत्याही कारणास्तव लिलाव पूर्ण न झाल्यास, त्यासंदर्भातील लिलाव वरील वेळापत्रकानुसार पुढील कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरावर घेण्यात येईल. ही प्रक्रिया लिलाव पूर्ण होईपर्यंत चालू राहील. शाखास्तरावर पहिला ऑफलाइन लिलाव अपयशी ठरल्यास, एसएएमआयएलचा ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://gold.samil.in आणि/किंवा e-Procurement Technologies Ltd. (AuctionTiger) – https://egold.auctiontiger.net/ यांच्या माध्यमातून ई-लिलावास देखील सुरुवात करण्यात येईल.

लिलावात सहभागी झालेल्या सर्व बोलीदारांना त्यांनी सादर केलेल्या बोली स्वीकारल्या आहेत की नाकारल्या गेल्या आहेत, याबाबत त्यानंतर कळवले जाईल.

**दिनांक : ०४.०४.२०२६** **सही / - प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**ठिकाण: गोवा** **फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि. करिता**


# प्रबोधन पूर्व प्राथमिक विभागाचा दीक्षांत समारोह उत्साहात साजरा



**प्रबोधन पूर्वप्राथमिक विभागाच्या शिबिरात व दीक्षांत समारंभात उपस्थित विद्यार्थ्यांसह प३काश नाईक, सौ. दीप्ती गावकर व शिक्षक.**

**पर्वरी (न. प्र.)**

प्रबोधन पूर्वप्राथमिक विभागाचा दीक्षांत समारोह व उन्हाळी शिबिर नुकतेच संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश तुकाराम नाईक तसेच सौ. दीप्ती आनंद गावकर हे मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे श्री. नाईक यांनी शिबिरामुळे मुले स्वावलंबी होतात. तसेच मुलांनी आपल्या शिक्षकांना कधीही विसरू नये. एकमेकांबरोबर चांगले वागावे असे सांगितले व त्यांनी आपल्या बालपणातील या बालांनो या, किलबिल किलबिल पक्षी बोलती या कविता सादर केल्या.

सौ. गावकर यांनी मुलांना कागदापासून फुले तयार करायला शिकवली. शिशुवाटिका प्रमुख सौ. कामाक्षी पै यांनी पहिलीत गेल्यानंतर कसे वागावे, अभ्यास कसा करावा याची माहिती दिली. मुलांनी तीन वर्षातील आपले अनुभव कथन केले.

पाहुण्यांचे स्वागत व परिचय शिक्षिका सौ. दीक्षा मराठे यांनी केले. शिबिरात दिवसभर मुलांनी वेगवेगळ्या प्रकारे आनंद लुटला व संध्याकाळी शिबिराची सांगता झाली.

### तुये येथे विद्या संकुलचे उद्या स्नेहसंमेलन

**पेडणे (न. प्र.)**

तुये येथील विद्या संकुल पूर्वप्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक सांस्कृतिक व बक्षीस वितरण सोहळा पेडणे येथील शेतकरी सभागृहामध्ये उद्या रविवारी दि. ५ रोजी संध्याकाळी ५ वा. होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पेडण्याचे आमदार प्रवीण आर्लेकर सन्माननीय अतिथी, स्पोर्ट्स् ऑफ युथ अफेअरचे संचालक अजय गावडे, खास आमंत्रित म्हणून ॲड. अमित सावंत व ॲड. तेजस तुळसकर, विद्यालयाच्या संचालिका सौ. संध्या पालयेकर उपस्थित असतील. सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संध्या पालयेकर यांनी केले आहे.

### कोरगाव येथे आज त्रैमासिक संगीत सभा

**पणजी (सां. प्र.)**

नुपूर डान्स अकादमीने श्री कमळेश्वर महारुद्र संस्थान कोरगाव च्या सहयोगाने शनिवार दि. ४ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता देऊळवाडा कोरगाव येथील श्री भूमिका मंदिरात

कला साधना त्रैमासिक संगीत सभा आयोजित केली आहे. यात निर्मिती शंकर नाईक, उमा उदय प्रभुदेसाई व पूजा पंडित शेट्ये भरतनाट्यम नृत्य सादर करणार आहेत.


**सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेड**

सीआयएन - L24233GA1985PLC001587
नोंदणीकृत कार्यालय - प्लॉट क्रमांक २५, २६, २९ आणि ३०, पिळर्ण औद्योगिक वसाहत, मयडे, साळगाव, बार्देश, गोवा- ४०३ ५११.
ईमेल : corp.sec@sandu.in, संकेतस्थळ : www.sandu.in, दूर.क्र. : ०८३२ ६७१५००६

**भागधारकांसाठी सूचना**

**दुसरी १००-दिवसीय मोहीम - ''सक्षम निवेशक'' - सुरू करण्याबाबतची विनंती : KYC आणि संबंधित अद्यतने, तसेच IEPF कडे न भरलेले/दावा न केलेले लाभांश हस्तांतरित होण्यापासून रोखण्यासाठी भागधारकांचा सहभाग वाढवणे - या संदर्भात**

मागील मोहिमेचाच पुढचा टप्पा म्हणून, प्राधिकरणाने (Authority) या उपक्रमाची व्याप्ती वाढवून तो पुन्हा सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. याद्वारे कंपन्यांकडून, दावा न केलेल्या किंवा न भरलेल्या लाभांशाचे थेट वितरण संबंधित पात्र भागधारकांना करणे अधिक सुलभ होईल. 'निवेशक शिविर' (Niveshak Shivir) ची उद्दिष्टे आणि IEPFA च्या गुंतवणूकदार शिक्षण, जागृती व सुविधा पुरवण्याच्या व्यापक कार्यकक्षेला अनुसरून, दुसरी १००-दिवसीय मोहीम - सक्षम निवेशक - सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. या मोहिमेचा मुख्य भर अशा भागधारकांवर असेल ज्यांचे लाभांश अद्याप दावा न केलेले आहेत; तसेच यामध्ये KYC अद्यतने आणि संबंधित अनुपालन (compliance) उपायांवर विशेष भर दिला जाईल. या मोहिमेने खालील प्रमुख कृतींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे:
१. सक्रिय सहभाग (Proactive Engagement) २. लाभांशावर वेळेवर प्रक्रिया ३. अनावश्यक हस्तांतरणे रोखणे ४. दाव्यांचा थेट निपटारा:
आपणास विनंती करण्यात येते की, आपण दिनांक १ एप्रिल २०२६ ते ९ जुलै २०२६ या कालावधीत 'दुसरी १००-दिवसीय मोहीम' (Second 100-Day Campaign) सुरू करावी.

**आवश्यक कृती**

ज्या भागधारकांनी अद्याप आपल्या लाभांशावर दावा केलेला नाही किंवा ज्यांचे KYC रेकॉर्ड अपूर्ण आहेत, अशा भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी कंपनीच्या 'नोंदणी आणि हस्तांतरण प्रतिनिधी' (RTA) यांच्याशी लवकरात लवकर संपर्क साधावा:
MUFG Intime India Private Limited, C-101, Embassy 247, L.B.S. Marg, Vikhroli (West), Mumbai - 400083 फोन: ८१०८११६७६७
https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/ServicešRequest.html
याव्यतिरिक्त, भागधारकांना 'SWAYAM' पोर्टलद्वारे आपली विनंती नोंदवण्यास आणि तिचा मागोवा घेण्यास प्रोत्साहित केले जाते: https://swayam.in.mpms.mufg.com

**महत्त्वाचा सल्ला**

कृपया नोंद घ्यावी की, लागू तरतुदींनुसार, जर लाभांश सलग सात वर्षांच्या कालावधीसाठी दावा न केलेला राहिला, तर लाभांशाची रक्कम आणि त्याशी संबंधित मूळ समभाग (उपलब्ध असल्यास) हे 'गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणाकडे' (IEPFA) हस्तांतरित केले जाण्यास पात्र ठरतात.
आम्ही सर्व भागधारकांना आग्रहाने विनंती करतो की, त्यांनी आपले हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी आणि वैधानिक आवश्यकतांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी या मोहिमेच्या कालावधीत त्वरित कृती करावी.

**भौतिक स्वरूपातील रोख्यांचे हस्तांतरण आणि अभौतिकीकरण (Dematerialisation) यासाठी विशेष संधी**

SEBI च्या दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजीच्या परिपत्रक क्र. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/ I/3750/2026 नुसार, भागधारकांना सूचित करण्यात येते की SEBI ने एक विशेष संधी (Window) उपलब्ध करून दिली आहे. ही संधी ५ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झाली असून, भौतिक स्वरूपातील रोख्यांचे हस्तांतरण आणि अभौतिकीकरण करण्यासाठी ती ४ फेब्रुवारी २०२७ पर्यंत खुली राहील. ही विशेष संधी अशा हस्तांतरण विनंत्यांसाठी देखील उपलब्ध असेल, ज्या यापूर्वी सादर करण्यात आल्या होत्या परंतु नाकारल्या गेल्या होत्या, परत पाठवल्या गेल्या होत्या, ज्यांची कागदपत्रे प्रक्रियेत होती किंवा इतर कोणत्याही कारणास्तव प्रलंबित होत्या. सविस्तर परिपत्रक https://sandu.in/circulars-to-investors/ या संकेतस्थळावर, तसेच खाली नमूद केलेल्या स्कॅन कोडद्वारे उपलब्ध आहे.
या 'विशेष खिडकी' (Special Window) अंतर्गत हस्तांतरित केल्या जाणाऱ्या रोख्यांची (Securities) नोंद, हस्तांतरण स्वीकारणाऱ्याच्या (Transferee) डिमॅट खात्यामध्ये केवळ 'डिमॅट स्वरूपात'च करणे अनिवार्य असेल. तसेच, हस्तांतरणाच्या नोंदणीच्या दिनांकापासून १ (एक) वर्षाच्या कालावधीसाठी हे रोखे 'लॉक-इन' (Lock-in) कालावधीच्या अधीन असतील. सदर लॉक-इन कालावधी दरम्यान, अशा रोख्यांचे हस्तांतरण करणे, त्यावर 'लियन' (Lien) नोंदवणे किंवा ते तारण ठेवणे (Pledge) यांसारख्या कृती करता येणार नाहीत. हस्तांतरणासाठी पुन्हा सादर केलेले (Relodged) समभाग (Shares), या विशेष खिडकीच्या कालावधीत केवळ 'डिमॅट स्वरूपात'च प्रक्रिया केले जातील. या संधीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपली मूळ समभाग प्रमाणपत्रे (Share Certificates), हस्तांतरणाची विनंती आणि त्यासोबत आवश्यक कागदपत्रे; कंपनीचे रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण एजंट ('RTA') असलेल्या 'MUFG Intime India Private Limited' यांच्याकडे खालील पत्त्यावर सादर करावीत:

**सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेड** यांच्याकरिता
स्वाक्षरी/-
**प्रतिका म्हांब्रे**
कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी

दिनांक: ०४.०४.२०२६


# गोमंतकीय संतांचे मराठीच्या संवर्धनात योगदान

### » डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन » 'गोमंतकीय मराठी भक्तिकाव्य धारा' परिसंवाद



**'गोमंतकीय मराठी भक्तिकाव्य धारा' प्रकल्पात सहभागी विद्यार्थी आणि कलाकारांसह मान्यवर डॉ. सदानंद मोरे, कुलगुरू प्रा. हरिलाल मेनन, डॉ. प्रकाश पर्येकर, प्रा. रामराव वाघ, प्रा. अनुराधा वागळे, डॉ. विनय मडगांवकर आणि इतर.**

**पणजी (पत्रक)**

संपूर्ण भारतावर इंग्रजांची सत्ता असली तरी त्या तुलनेत गोमंतकावर युरोपिय पोर्तुगीजांची सत्ता अधिक काळ होती. त्यांनी येथील श्रद्धास्थाने नष्ट केली. धार्मिक प्रथा परंपरांवर इन्क्विझिशनच्या माध्यमाने प्रतिबंध लादले, ग्रंथ जाळले. अशा बिकट परिस्थितीत गोमंतकीय संतांनी स्वधर्माचे पालन करत विपुल प्रमाणात ग्रंथरचना केली. या संतांनी केलेली साहित्यनिर्मिती मराठी जीवनप्रणालीला नवचेतना प्रदान करणारी ठरली, असे प्रतिपादन संत साहित्याचे जेष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

संत ज्ञानेश्वर सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्षानिमित्त गोवा विद्यापीठातील संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन, मराठी अध्ययनशाखा आणि डिजिटल अध्यापन आणि संसाधन संचालनालय आयोजित 'गोमंतकीय मराठी भक्तिकाव्य धारा' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. व्यासपीठावर गोवा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. हरिलाल मेनन, अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालय चे संचाल डॉ. प्रकाश पर्येकर, डिजिटल अध्यापन आणि संसाधन संचालनालयाचे संचालक, प्रा. रामराव वाघ, शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा अधिष्ठाता प्रा अनुराधा वागळे, 'गोमंतकीय मराठी भक्तिकाव्य धारा' प्रकल्प आणि संचालक, मराठी अध्ययनशाखा समन्वयक डॉ. विनय मडगांवकर हे मान्यवर उपस्थित होते.

**परिसंवाद रंगला**

डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली 'गोमंतकीय मराठी भक्तिसाहित्य' या विषयावरील झालेल्या परिसंवादात गोमंतकीय मराठी ग्रंथपरंपरा : श्रीकृष्णचरित्रकथा प्रा. केतकी मराठे, गोमंतकीय मराठी संतसाहित्य आदर्श नाईक, गोमंतकीय कीर्तन परंपरा आणि संतसाहित्य प्रा. सायली गर्दे , गोमंतकीय भजन परंपरा आणि संतसाहित्य दिव्या च्यारी, गोमंतकीय सांस्कृतिक अधिष्ठान आणि संतसाहित्य प्रा. ओंकार गोवेकर यांनी शोधनिबंध प्रस्तुत केले.

गोमंतकीय संतांच्या अभंगांचे सुश्राव्य ध्वनिचित्र-मुद्रण आणि संशोधित ई-साहित्य 'गोमंतकीय मराठी भक्तिकाव्य धारा' या संशोधनात्मक प्रकल्पाचे कुलगुरू प्रा. मेनन यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

**भक्तिकाव्य धारेचे प्रस्तुतीकरण**

यानंतर संत सोहिरोबानाथ आंबिये, संत कृष्णंभट्ट बांदकर, कवी मंगेश, सोंसूबाई आणि जीवनमुक्त महाराज ह्या गोमंतकीय संतांच्या अभंगावर आधारित 'गोमंतकीय मराठी भक्तिकाव्य धारा' या सुश्राव्य ई-साहित्याचे शानदार प्रस्तुतीकरण झाले. डॉ. मडगांवकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रकल्पाला डॉ. अरुणा ढेरे यांनी सहकार्य केले आहे. डिजिटल अध्यापन आणि संसाधन संचालनालयाचे प्रशासकीय अधिकारी सचिन संभाजी, सचिन पाटील, नितीन पाटील आणि संदेश गावस यांनी या अभंग ई-साहित्याचे ध्वनीचित्र-मुद्रण आणि संपादन केले आहे.

गोमंतकातील नामवंत संगीतकार विष्णू शिरोडकर यांनी संगीत दिग्दर्शन केले तर जयेंद्रनाथ हळदणकर यांनी दिग्दर्शन केले आहे. सुप्रसिद्ध गायक अक्षय नाईक यांनी गायन आणि ध्वनीमुद्रण केले. गौतमी हेदे बांबोळकर, गणेश मेस्त्री, देवानंद मालवणकर, स्नेहल गुरव कारखानीस या कलाकरांनी अभंग गाऊन प्रस्तुत केले आहेत. या गायक कलाकार व यात अभिनय केलेल्यांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन झाले. डॉ. पर्येकर यांनी स्वागत तर डॉ. मडगांवकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वाघ, डॉ. वागळे यांनी मनोगत व्यक्त केले. आरती चंद्रेकर आणि रंजीता गावडे यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी डॉ. विनायक बापट यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

# Zest

WEEKEND LIFESTYLE MAGAZINE



**"But better to get hurt by the truth than comforted with a lie."**

— *Khaled Hosseini*

# Reflections from the kitchen

**From New York kitchens to Mumbai icons, Rahul Akerkar reveals in his memoir the choices and chaos behind his culinary journey**

VINIKA VISWAMBHARAN
NT BUZZ




Rahul Akerkar

Behind every restaurant and every signature dish is a story of choices, risks and detours. Chef Rahul Akerkar tells his in 'Biting Off More Than I Can Chew.'

"I wasn't interested in writing a victory lap," he says. "I wanted to understand the decisions, good, bad and questionable, that led me here."

Over three decades, Akerkar has built restaurants across Mumbai and beyond. He describes his journey not as a steady climb but as a series of instinctive leaps, often made before he fully grasped their consequences. "I've spent most of my life in kitchens, opening restaurants, dismantling them, starting again and sometimes getting it right," he says

His portfolio includes Under The Over, Indigo, Indigo Deli, Qualia, and now Ode, Waarsa and Flint. While these names are usually linked to the rise of modern Indian dining, he insists, "When we started, it was really just instinct, curiosity and a willingness to take risks."

Many ventures began without the capital, team or experience he needed. At the time, those choices didn't feel like mistakes. "In all the chaos, it feels like you're just solving problems," he recalls. "Later, you see how much was held together by instinct, stubbornness and a refusal to let things fail."

The title captures a pattern he came to recognise: "Taking on more than I'm ready for, more than I understand, more than is sensible," he says.

The narrative moves from his childhood to his years in New York kitchens, then back to Mumbai, where much of his work took shape. The book grew not from a milestone but from a pause, as the COVID-19 pandemic slowed his pace. "Life slowed down to a point where I was engulfed by stillness," he says, which allowed him to look back without the pressure of running a business. What he found was not always comfortable. "How much of what I thought was confidence was actually improvisation," he reflects, "and how many decisions came from uncertainty rather than clarity." Writing became a way to think about those moments more closely and changed how he reads his past.

Akerkar notes that when you're in the middle of things, everything feels urgent and final. "Looking back, you realise it was more complicated than it seemed and memory reshapes those events. You connect dots that didn't exist at the time. You assign meaning to accidents."

This gap between experience and memory runs through the book. "It's not really a 'chef's story,'" he says. "It's about risk, ambition, failure and the decisions you make when trying to build something that doesn't yet exist." He returned to working without a clear plan. "Most of the meaningful things I've done came from saying yes before I fully knew how," he admits.

Writing also reshaped his view of success, making him aware of both its demands and hidden costs. "Success, as it's usually defined, is quite external. The book forced me to look at the internal cost of chasing it," he says. He doesn't try to resolve that tension: "I'm not sure I have a cleaner definition now but I'm more aware of what it takes and what it quietly takes away."

# More than just a meal

**Raia Empowerment Foundation is set to open an inclusive cafe creating jobs for persons with disabilities**

CHRISTINE MACHADO
NT BUZZ

A 119-year-old heritage house in Raia is all set for a new innings with Avo Betty's Cafe, scheduled to open in May. The initiative by the Raia Empowerment Foundation aims to provide employment for persons with disabilities.

A core committee member, Sandra Sousa Menon, says, "The Raia Empowerment Foundation is a not-for-profit set up to focus on ability, not disability. Avo Betty's Cafe is one way we put this into practice, where people can work with dignity and purpose."

The cafe is named after the mother Judith Vaz Noronha (one of the committee members), who has opened her ancestral home for this project. "The cafe honours her love for food and her home-style recipes," explains Menon. "It's not just a place to eat; it continues her traditions and shares them with the community."



Sandra Menon

The menu includes freshly brewed teas and coffees, as well as Goan specialties such as stuffed poie, rissois and other savoury snacks, with a focus on comfort and accessibility.

At the cafe, persons with disabilities will take on daily tasks while undergoing training in hospitality, kitchen work, food handling, customer service and life skills. "Chefs Sebastian and Sandip, will guide the training to prepare everyone for their roles," says Menon, who also designed the cafe space. "Our goal was to create a functional space that works for everyone involved."



Employees preparing the meal for the inaugural

The other members include former president and executive director at Ashok Leyland, Rajive Saharia; restoration expert Melwin Chico; and counsellor Debra Goes Proença. Together, says Menon, they bring a mix of expertise to manage the cafe efficiently and inclusively.



# More trauma, less drama

**Film:** *The Drama*
**Cast:** Robert Pattinson, Zendaya
**Directed by:** Kristoffer Borgli
**Duration:** 1 hour 46 minutes
**Rating:** **



*The Drama*, written and directed by Kristoffer Borgli, certainly lives up to its title but not in a way that works to its advantage. There is no shortage of drama here, but what value does it hold when you feel absolutely nothing for the people at its center? At no point do you truly connect with the lead characters, two lovers who are clearly in desperate need of therapy, yet instead of seeking help, they seem intent on making each other's lives and yours as a viewer, miserable.

The story itself is as exhausting and grating as the harsh midday sun. If the film is trying to make a larger statement about relationships or human behaviour, it is so obscured that it barely registers. As Jim Morrison famously observed, "people are strange" but even then, storytelling demands that we find some way to empathise with its characters. No matter how flawed or even pathetic they may be, there should be a thread that draws us in emotionally. Here, that thread is missing.

Instead, what remains is a lingering sense of indifference, not just toward the central couple, but toward nearly every character in the film. Charlie (Robert Pattinson), a museum curator, meets Emma (Zendaya) in a cafe. Their relationship begins with a lie, as he pretends to share an interest in the book she is reading and quickly escalates into love. A proposal follows, refreshingly devoid of cliche theatrics, replaced instead with an oddly practical moment where he tests her hearing. A wedding is planned. On paper, it all feels conventional, almost mundane.

**FILM REVIEWS
SACHIN CHATTE**

Things begin to unravel during a seemingly harmless game played over drinks with their friends Mike (Mamoudou Athie) and Rachel (Alana Haim), in which each person answers the question, "What is the worst thing you've ever done?" Predictably, alcohol loosens tongues and secrets spill out. Charlie admits to cyberbullying in his youth, Rachel recounts locking a child in a closet, and Mike shares an unsettling story involving a dog and an ex. Emma's confession, however, is surprisingly tame; she recalls a disturbing thought she once had as a child but never acted upon.

Despite the film's marketing hinging on this "dark secret", the revelation feels underwhelming, even trivial. If anything, it is the least troubling admission of the group. Yet Charlie fixates on it obsessively. What follows is a downward spiral: he loses sleep, his thoughts become consumed by Emma's confession, and their relationship begins to deteriorate under the weight of something that barely warrants such intensity. As their wedding approaches, with all the usual preparations in motion, their emotional state becomes increasingly unstable.

Watching this unfold, you can't help but wish that every single one of them would seek therapy. Their behaviour feels exaggerated to the point of absurdity, raising the question, if this is meant to reflect the average functioning adult, what does that say about the world at large? If this is how an average literate person in America behaves, no wonder the world is where it is today.

The film clearly aims to explore the complexities of human nature and modern relationships, which is a worthwhile ambition. However, it falters in execution. It is not just about what happens, but how it unfolds and *The Drama* becomes most frustrating in its inability to present this convincingly. You find yourself wanting Charlie to mature, to show some emotional resilience instead of wallowing in self-inflicted turmoil. Similarly, Emma's characterization lacks consistency, making her actions difficult to grasp or invest in.

| | |
|---|---|
| Outstanding | ★★★★★ |
| Excellent | ★★★★☆ |
| Good | ★★★☆☆ |
| Average | ★★☆☆☆ |
| Poor | ★☆☆☆☆ |

Both lead actors bring a certain charm and screen presence to their roles, but even their performances cannot salvage the emotional disconnect at the heart of the film. If Charlie and Emma were to invite you to a party, you would not just decline, you would keep your distance entirely.

PICS BY HEMANT PARAB







# Faith and tradition

NT BUZZ

As Catholics across the state observed Good Friday, devotees at Se Cathedral in Old Goa took part in the 'Xhepdeanchem Pursanv,' a tradition dating back to the 16th century. Also called the 'Procession of Capas Magnas,' it is known as the 'Procession of Tails.'

After the service, a life-size statue of Jesus is brought down from the cross, placed in a coffin and carried in procession by members of the Confraria. Canons dressed in black robes with long tails follow the coffin. This year, the three newly inducted canons, Fr. Walter De Sa, Fr. Leonardo Pegado e Souza and Fr. Antonio Francisco Salema, joined the procession.







## निवडक

### मुळस-दोडामार्ग येथे कारला भीषण अपघात

**दोडामार्ग (न. प्र.)**

दोडामार्ग तालुक्यातील मुळस येथे एका कारचा (टीएस १३ ईव्ही ०४०५) भीषण अपघात झाला. यात कारच्या दर्शनी भागाचे प्रचंड नुकसान झाले असून सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. संबंधित कार ही तेलंगणा राज्यातील असून ती या मार्गावरून प्रवास करत असताना मुळस परिसरात हा अपघात झाला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### महाभारतावर उद्या पिळर्ण येथे परिसंवाद

**पणजी (सां. प्र.)**

'महाभारत'मधील कथानकाच्या मुळाशी स्त्रियांची निर्णायक भूमिका असल्याचा नवा दृष्टिकोन पुढे आणणारा विशेष परिसंवाद उद्या रविवार दि. ५ एप्रिल रोजी सकाळी ११वाजता 'मोग संडे' उपक्रमांतर्गत पिळर्ण औद्योगिक वसाहती मधील म्युझियम ऑफ गोवा, (मोग) मध्ये आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादात ख्यातनाम पटकथालेखक तथा अध्यापक संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते अंजुम राजाबली महाभारतातील स्त्री पात्रांचा सखोल अभ्यास मांडणार आहेत. प्रवेश विनामूल्य असून उपस्थित राहण्यासाठी पूर्वनोंदणी ७७२२०८९६६६ या क्रमांकावर संदेशाद्वारे नोंद करावी, असे कळवले आहे.

## सहवेदना

### कृष्णनाथ दत्ताराम परब

**माशेल (पत्रक)**



कुंभारजुवे येथिल कृष्णनाथ दत्ताराम परब (४७) यांचे गोवा वैद्यकीय महाविद्यालयात उपचारादरम्यान सोमवार दि. ३० रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि आठ वर्षांची मुलगी आहे. त्यांच्या पार्थिवावर दि. ३१ मार्च रोजी माडापै स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सत्तरीत सलग आपत्कालीन घटनांची मालिका

## आग लागून काजू बागायतीचे नुकसान

## अग्निशमक दलाची धावपळ, मोठे नुकसान टळले

**वाळपई (प्रतिनिधी)**

**सत्तरी तालुक्याच्या अनेक भागांमध्ये गुरुवारी संध्याकाळी तुरळक पाऊस लागला. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे झाडे पडण्याच्या घटना घडल्या. यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला. विद्युत तारांवर झाडे पडल्यामुळे वीजवाहिन्यांचे नुकसान झाले. सत्तरी तालुक्याच्या अनेक भागांमध्ये रस्त्यावर झाडे पडून नुकसान झाले. वाळपई अग्निशामक दलाच्या जवानांनी तात्काळ अनेक ठिकाणी धाव घेऊन रस्त्यावर पडलेली झाडे हटविली. त्याचप्रमाणे घरावर पडलेली झाडे हटविण्यात महत्त्वाचे योगदान दिले. त्याचप्रमाणे सकाळच्या सत्रामध्ये अनेक ठिकाणी काजू बागायतीना आग लागून नुकसान होण्याच्या घटना घडल्या.**

सत्तरी तालुक्यातील मोर्ले परिसरात गुरुवारी दुपारनंतर सलग आपत्कालीन घटनांची मालिका घडल्याने वाळपई अग्निशामक दलाच्या जवानांची मोठी धावपळ उडाली. आगीची घटना तसेच झाडे रस्त्यावर कोसळणे, विद्युत तारा तुटणे अशा विविध घटनांमध्ये अग्निशामक दलाने तत्काळ प्रतिसाद देत परिस्थिती नियंत्रणात आणली.

दुपारी बागवाडा, मोर्ले येथील पाण्याच्या टाकीजवळ काजू बागायतीला आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच वाळपई अग्निशामक दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या पथकाचे नेतृत्व ए. एन. देसाई यांनी केले. आग आटोक्यात आणण्यात यश आले असून या घटनेत अंदाजे २०,००० रुपयांचे नुकसान झाले, तर सुमारे ५०,००० रुपयांची मालमत्ता वाचवण्यात यश मिळाले. यामुळे बागायतीचे मालक गुरुदत्त कामत यांनी वाळपई अग्निशामक दलाचे आभार मानले.

संध्याकाळच्या सत्रात काही प्रमाणात वादळी वारा झाल्यामुळे नुकसान झाले. वेळूस, वाळपई येथील रवळनाथ मंदिराजवळ काजू झाडाची फांदी रस्त्यावर कोसळून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. वाळपई अग्निशामक दलाचे पथक श्री. के. सी. नाईक यांच्या नेतृत्वाखाली घटनास्थळी पोहोचून रस्ता त्वरित मोकळा करण्यात आला.

### झाडे व विद्युत तारा पडल्या

घोडेमळ मोर्ले येथील सातेरी मंदिराजवळ झाड रस्त्यावर कोसळल्याची घटना घडली. तसेच मोर्ले कॉलनी येथे झाडासह विद्युत तारा रस्त्यावर पडल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती. या सर्व घटनांमध्ये अग्निशामक दलाच्या जवानांनी तत्परतेने कार्यवाही करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या मोहिमेत के. सी. नाईक, ए. व्ही. नाईक, ए. जी. नार्वेकर व ए. ए. शेटकर यांनी सहभाग घेतला. या घटनांमध्ये कोणतेही नुकसान झाले नाही.





**सत्तरी तालुक्यात एका काजू बागायतीला लागलेली आग. वाऱ्यामुळे पडलेली झाडे हटवताना वाळपई अग्निशामक दलाचे जवान.** (छाया : दीपा सावंत)

### घरावर आम्रवृक्ष पडला

घोडेमळ, मोर्ले तसेच केरसरकर वाडा, मोर्ले येथेही अग्निशामक दलाने धाव घेतली. केरसरकर वाडा येथे आंब्याचे झाड दोन घरांवर कोसळल्याची घटना घडली. या घटनेत सुमारे ५,००० रुपयांचे नुकसान झाले, तर अंदाजे ८०,००० रुपयांची मालमत्ता वाचवण्यात आली. या सर्व कारवाईत श्री. देसाई, आर. आर. कवठणकर, जी. डी. पावणे व के. एच. गावंकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्व घटनांनंतर अग्निशामक दलाचे पथक रात्री उशिरापर्यंत काम करीत होते.

पिसुर्ले मार्गावर वडाकडे (सत्तरी) येथील पुलाजवळ एक वासरू दरीत पडल्याची माहिती मिळताच वाळपई अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. श्री. देसाई यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दोरीच्या साहाय्याने वासराला सुरक्षित बाहेर काढले. या मोहिमेत उमेश गावकर व गोकुळदास डेगवेकर यांनी सहभाग घेतला.

### कोरड्या गवताला आग

दुपारी भुईपाल (सत्तरी) येथील विहीरीकडे परिसरात कोरड्या गवताला आग लागल्याची घटना घडली. वाळपई अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही हानी झाली नाही.

### घरावर झाडे कोसळली

याच परिसरातील भेडशीवाडा, भुईपाल येथे दुपारी आंब्याच्या झाडाची मोठी फांदी घरावर कोसळल्याची घटना घडली.

